**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ३० जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **तंत्रज्ञानामध्ये इतर क्षेत्रांप्रमाणेच पशुवैद्यकीय औषधं आणि उपचारांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणण्याची क्षमता असल्याचं राष्ट्रपतीचं प्रतिपादन.**
2. **विधिमंडळाच पावसाळी अधिवेशन सुरु; 57 हजार 509 कोटींच्या पुरवणी मागण्या सादर पायाभूत प्रकल्पांची निर्मिती, कुंभमेळ्याचे नियोजन, मागास घटक विकासासाठीच्या निधीचा समावेश.**
3. **रेल्वेचा आरक्षण तक्ता आता रेल्वेगाडी सुटण्याच्या आठ तास आधी तयार करण्याच्या रेल्वेमंत्र्यांच्या सूचना.**
4. **एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून तिकीट दरात १५ टक्के सवलत.**

-------------------------------

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

**तंत्रज्ञानामध्ये इतर क्षेत्रांप्रमाणच पशुवैद्यकीय औषधं आणि उपचारांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणण्याची क्षमता असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज उत्तरप्रदेशात बरेली इथ पशुवैद्यकीय संशोधन संस्थेच्या दीक्षांत समारंभाला संबोधित करत होत्या. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पशुवैद्यकीय रुग्णालयांना सक्षम बनवता येईल, असंही त्या यावेळी म्हणाल्या.....**

***(होल्ड बाईट - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 26 सेकंद)***

***टेक्नोलॉजी अन्य क्षेत्रों की तरह पशु चिकित्सा और देखभाल में भी क्रांतिकारी परिवर्तन लाने की क्षमता रखती है। टेक्नोलॉजी के प्रयोग से देशभर के पशु चिकित्सा को सशक्त बनाया जा सकता जेनोमेल्टिंग, एम्ब्रयो ट्रान्सफर टेक्नोलॉजीज, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, बिग डेटा ऐनालिटिक्स जैसे टेक्नोलॉजी के प्रयोग से इन क्षेत्रों में क्रांतिकारी बदलाव ला जा सकते हैं।***

**प्राण्यांची सेवा करणं ही नैतिक जबाबदारी असून पशुवैद्यांना त्यांच्या कामाप्रति वचनबद्ध राहावं असं आवाहनही त्यांनी केलं. तसंच, त्यांनी ग्रामीण भागात पशुवैद्यकीय सेवा सुलभरित्या मिळण्याचं महत्त्वही अधोरेखित केलं. प्राण्यांना**

वेळेवर वैद्यकीय उपचार देण्यासाठी गावोगावी पशुआरोग्य मेळावे नियमितपणे आयोजित करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

-------------------------------

पुरवणी मागण्या

विधीमंडळाच्या जून 2025 च्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त आणि  नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज 57 हजार 509 कोटी 71 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्यान राज्यात रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि  अंमलबजावणी, महात्मा ज्योतीराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी 19 हजार 183 कोटी 85 लाख रुपये अनिवार्य तर 34 हजार 661 कोटी 34 लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि 3 हजार सहाशे 64 कोटी 52 लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. स्थूल पुरवणी मागण्या 57 हजार 509 कोटी 71 लाख रुपयांच्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा 40 हजार 644 कोटी 69 लाख रुपयांचा आहे. उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त आणि  नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज सादर केलेल्या 57 हजार 509 कोटी 71 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक 11 हजार 42 कोटी 76 लाख रुपये हे पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अनुदानांसाठी खर्च होणार आहेत. 3 हजार 228 कोटी 38 लाख रुपये हे मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा यांच्या मुद्रांक शुल्क अधिभार परताव्यापोटीचे आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोनसाठी 2 हजार 182 कोटी 69 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

-------------------------------

अनिल देशमुख पत्रकार परिषद

महाराष्ट्रातील महीला, तरुणी आणि  लहान मुलींवरील अत्याचारासंदर्भात तयार महाविकास आघाडीच्या सरकारतर्फे करण्यात आलेला "शक्ती" कायदा अमलात आणण्या संदर्भात सध्याच सरकार उदासिन असल्याचा आरोप राष्ट्रवादी

काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज नागपूरात पत्रकार परिषदेत केला आहे....

*(होल्ड बाईट- अनिल देशमुख 31 सेकंद)*

*पण अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे की एक वर्षापूर्वी केंद्र शासनाने राज्य शासनाला कळवून सुद्धा समितीचे गठन झालं नव्हत आता नुकताच समितीचे गठन झालेले आहे. म्हणजे एक वर्ष केंद्र शासनाने कळवून सुद्धा समितीचे गठन झाले नाही. मोठ्या प्रमाणात जे महिलांवर आणि मुलींवर अत्याचार होतात त्यांना थांबण्यासाठी हे शक्ती विधायक अतिशय महत्त्वाचं आहे. त्यामुळे एक-एक वर्षात समिती गठीत करायला राज्य शासनाला लागत असेल तर शासनाची उदासीनता या संपूर्ण प्रकरणामध्ये दिसते.*

राज्यात महीला, तरुणी आणि लहान मुलीवर अत्याच्याराच्या घटना लक्षात घेता गृहमंत्री असतांना अनिल देशमुख यांनी आंध्रप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात "शक्ती" कायद्याचा मसुदा तयार केला होता. यासाठी सर्व पक्षीय महिला आमदारांसह वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची एक समीती तयार केली होती. यानंतर हा "शक्ती" कायदा विधानसभा आणि विधानपरिषद मध्ये मंजूर करुन तो केंद्राकडे अंतीम मंजुरीसाठी पाठविला होता. परंतु याला आता ५ वर्ष पूर्ण झाले तरी हा कायदा अंतीम स्वरुप घेवू शकला नाही. केंद्रीय गृह मंत्रालयान राज्य शासनाला एक वर्षापुर्वी या कायद्यामधील त्रुटी दूर करण्यासाठी एक वर्षापूर्वी अभ्यास समीती स्थापन करण्यास सांगीतल होत. आता एक वर्षानंतर ती समीती तयार करण्यात आली आहे.

-------------------------------

रेल्वे आरक्षण

रेल्वेच आरक्षण तक्ता आता रेल्वेगाडी सुटण्याच्या आठ तास आधी तयार करण्यात यावा. अशा सूचना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेमंडळाला दिल्या आहेत. हा नियम टप्प्याटप्प्यान लागू होईल. यामुळ आरक्षणाच्या प्रतिक्षा यादीत असलेल्या प्रवाशांना दिलासा मिळेल आणि प्रवासाकरता इतर पर्यायांचा विचार करता येईल. अशी माहिती रेल्वे मंत्रालयान दिली. भारतीय रेल्वे पुढील महिन्याच्या १ तारखेपासून आय.आर.सी.टी.सी. वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर फक्त अधिकृत वापरकर्त्यांनाच तत्काळ तिकिटे आरक्षित करण्याची परवानगी देईल. या वर्षी जुलैच्या अखेरीस तात्काळ आरक्षणासाठी ओटीपी-आधारित प्रमाणीकरण केले जाईल, अशी माहितीही मंत्रालयानं दिली.

-------------------------------

## तिकीट दर सवलत

एसटीच्या लांब आणि  मध्यम पल्ल्याच्या १५० कि.मी.पेक्षा जास्त प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पुर्ण तिकीट धारी, सवलतधारक प्रवासी वगळून  इतर  प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी आणि  उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात उद्या १ जुलैपासून करण्यात येत आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा अस आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. १ जुनला एस टी च्या ७७ व्या वर्धापन दिन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक  यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे. ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे. मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित इ-शिवनेरी बसमधील पुर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर,  अथवा एमएसआरटीसी बस रिजर्वेशनया मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५% सवलत प्राप्त करता येऊ शकते.

-------------------------------

## विधानमंडळ कामकाज

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज प्रारंभ झाला. आजच्या पहिल्या दिवशी विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला मंत्र्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर विविध अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर ठेवल्या. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. त्यानंतर त्यांनी तालिका सदस्य म्हणून अमित साटम, किशोर पाटील, सुलभा खोडके, चेतन तुपे, नितीन देशमुख, संजय मेश्राम, अभिजित पाटील, समीर कुनावार आणि समाधान आवताडे यांची नियुक्ती केली. त्यानंतर संबंधित मंत्र्यांनी विविध शासकीय विधेयकं सभागृहासमोर ठेवली. यानंतर, माजी आमदार रोहिदास देशमुख, विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट

पक्षाचे ज्येष्ठ नेते लहानू कोम आणि समाजसेविका डॉ. श्रद्धा टापरे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडला.

------------------------------

आंदोलन

विधिमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी विधान भवन प्रांगणातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. दरम्यान, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मराठीच्या मुद्द्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली.

------------------------------

हवामान

नागपुरात आज सकाळ पासून ढगाळ वातावरण असून, पाऊस पडत आहे. येत्या काही तासांत गडचिरोली, चंद्रपूर येथे काही ठिकाणी, तर विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

------------------------------